भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. २०/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०८/०१/२०१७

**१) गैरकायदयाची मंडळी जमवुन शासकीय आदेशाचे उल्लघंन केल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक ०७/०१/२०१७ चे १४.१० वा. दर. यातील राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाच्या वतीने मोदी सरकारचे विरोधी धोरनाचे निषेर्धात यातील पाचही आरोपीतांनी गैरकायदयाची मंडळी जतवुन शासकीय आदेशाचे उल्लघन करून एनएख ६ रोडवर बसुन रस्ता अडवुन वाहतुकीस अडथडा केला व जिल्हाधिकारी भंडारा यांचे कलम ३७ (१)(३) मपोका आदेशाचे उल्लघंन केल्याने सरतर्फे पोना साबळे पो.स्टे.भंडारा यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १४३,३४१,१८८ भादवी. सहकलम १३५ मपोका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. गायकवाड पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**२) सार्वजनीक ठिकानी वाहन उभे ठेवुन रहदारीस अडथडा निर्माण झाल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०७/०१/२०१७ चे १२.०० वा. दर. यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील वाहन सार्वजनीक रस्त्यावर जानाऱ्या येनाऱ्या लोंकाना रहदारीस अडथळा निर्मान होईल अशा प्रकारे उभे केले व ट्रव्हल चे मुळ कागज पत्र जवळ न बाळगल्याने सरतर्फे पोउपनी हावरे पो.स्टे. तुमसर यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २८३ भांदवी. सहकलम १३९/१७७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. हावरे पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**३) नॉयलान दोरीने गळफास लावुन इसमाचा मृत्यु :–**

दिंनाक ०७/०१/२०१७ रोजी १२.०० वा. दर. यातील फिर्यादी नथ्थु गोरबाजी मोहतुरे वय ६० वर्ष रा. गुरढा हा घरी हजर असतांना फिर्यादीची सुन हीने घरी येवुन सांगीतले की मृतक नरेश किशन मोहतुरे वय ३३ वर्ष रा गुरढा हा स्मशान भुमी जवळ झाडाला गळफास लावुन मरण पावलेल्या अवस्थेत दिसत आहे असे सांगीतल्याने फिर्यादीने घटनास्थळी जावुन पाहीले तर मृतक हा पळसाच्या झाडाला नॉयलान कच्या दोरीने गळफास लावुन दोरी तुटुन खाली जमीनीवर उबळया स्थीतीत पडुन दिसुन आल्याने फिर्यादीचे तोंडी रीपोर्ट वरून पोलीस स्टेशन पालांदुर कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद केला. पुढील तपास सफौ. कोल्हे पो. स्टे. पालांदुर हे करीत आहे.

**४) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :–**

दिनांक ०७/०१/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली ७७ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी, अवैध प्रवासी वाहनावरती ०२ तिन सिटर वाहनांवरती ०८ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ६७ केसेस करण्यात आलेल्या आहे.

प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ९४२३११५१८२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, **संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.